N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नागपुर ग्रामीण **P.S.(ठाणे):** उमरेड **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0955 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 07/12/2019 20:36 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 A लाे.प्र.का 1988 (सुधारणी) 2018 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शनिवार
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Date From (दिनांक पासून):** 07/12/2019
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 07/12/2019
   **Time From (वेळेपासून):** 13:06 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 14:46 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 07/12/2019 **Time (वेळ):** 20:13 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 031 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 07/12/2019 20:13 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 01 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** ईतवारी पेठ ,उमरेड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री अली अनवर मोहम्मद बाबर शेख

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1978 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

## फिर्याद

अॅन्टी करप्शन ब्युरो, नागपूर
दिनांक ०७/१२/२०१९

मी श्री. अली अनवर मोहम्मद बाबर शेख वय ४१ वर्ष व्यवसाय—अगरबत्ती दुकान रा. नवीन सब्जी मार्केट, ईतवारीपेठ उमरेड मो.नं. ७०२०५१४५९९

मी वर दिलेल्या पत्यावर राहत असुन दि. ०६.१२.२०१९ रोजी पोलीस निरीक्षक श्री. सारंग मिराशी, अॅन्टी करप्शन ब्युरो, नागपूर यांचे समक्ष लोकसेवकाविरूध्द लाच मागणी संबंधाने तक्रार नोंदविली. पोलीस निरीक्षक श्री. सारंग मिराशी, अॅन्टी करप्शन ब्युरो, नागपूर यांनी माझ्या सांगण्याप्रमाणे माझी तक्रार संगणकावर टंकलिखीत करून त्यावर सही घेतली. मी नोंदविलेली तक्रार खालील प्रमाणे आहे.

## तक्रार

अॅ.क.ब्यु. नागपूर
दि. ०६.१२.२०१९

माझे नाव :— श्री. अली अनवर मोहम्मद बाबर शेख वय ४१ वर्ष व्यवसाय—अगरबत्ती दुकान रा. नवीन सब्जी मार्केट, ईतवारीपेठ उमरेड मो. ७०२०५१४५९९

मी समक्ष हजर येवुन आपली रिपोर्ट देतो की, मी वर नमुद ठिकाणी राहत असुन उमरेड येथील भिसीनाका चौक ईतवारीपेठ उमरेड येथे अगरबत्तीचा व्यवसाय करतो.

मी माझे राहते घरी नवीन विज मिटर घेण्याकरिता दि. ०८.११.२०१९ रोजी ऑनलाईन पध्दतीने अर्ज केला होता. त्यानंतर ऑनलाईन पध्दतीने अर्ज तसेच नवीन मिटर घेण्याकरिता आवश्यक असलेले कागदपत्रे घेवून अंदाजे २—३ दिवसानंतर म.रा.वि.वि.कं.मर्या कार्यालय उमरेड येथे गेलो. कार्यालयातील श्री. एस.एस. काळे, सहायक अभियंता यांना भेटलो असता त्यांनी मला म्हटले की, १—२ दिवसात आमचे कार्यालयातील लाईनमेन कर्मचारी आपले घरी लोड टेस्टिंगकरिता येतील असे म्हणाले त्यानंतर मी घरी परत आलो. त्यानंतर बरेच दिवस होवून सुध्दा म.रा.वि.वि.कं.मर्या कार्यालय उमरेड येथील कोणीही लाईनमेन कर्मचारी माझे राहते घरी लोड टेस्टिंगला न आल्यामुळे मी परत म.रा.वि.वि.कं.मर्या कार्यालय उमरेड येथे जावून श्री. एस.एस. काळे, सहायक अभियंता यांना भेटलो असता लाईनमेन कर्मचारी पाठवतो असे ते म्हणाले.

त्यानंतर दि. ०२.१२.२०१९ रोजी म.रा.वि.वि.कं.मर्या कार्यालय उमरेड येथील लाईनमेन कर्मचारी श्री. महादेव गिल्लूरकर हे माझे राहते घरी लोड टेस्टिंगला आले व घराची तपासणी करून मला म्हणाले की, तुम्हाला तुमच्या राहते घरी मिटर लावायचे असतील तर मला रू. ५०००/— दयावे लागतील. त्यानंतर श्री. महादेव गिल्लूरकर हे निघून गेले. दि. ०३.१२.२०१९ रोजी म.रा.वि.वि.कं.मर्या कार्यालय उमरेड येथे जावून श्री. एस.एस. काळे, सहायक अभियंता यांना भेटलो असता मला म्हणाले की, ''तुमचे डिमांड तयार असुन मी सोबत आणले नाही, तुम्ही मला नंतर फोन करा'' असे मला म्हणाले. त्यानंतर परत दि. ०५.१२.२०१९ रोजी म.रा.वि.वि.कं.मर्या कार्यालय उमरेड येथे जावून श्री. एस.एस. काळे, सहायक अभियंता यांना भेटलो असता मला म्हणाले की, ''तुमचे डिमांड तयार असुन मी सोबत आणले नाही, तुम्ही मला उदया फोन करा'' असे मला म्हणाले.

म.रा.वि.वि.कं.मर्या कार्यालय उमरेड येथील कर्मचारी श्री. महादेव गिल्लूरकर यांनी मला माझ्या राहत्या घरी नविन विज मिटर लावण्याकरिता मागीतलेली लाच रक्कम रू. ५,०००/— त्यांना देण्याची माझी मुळीच ईच्छा नाही तसेच त्यांच्याशी माझे पुर्वीचे कोणतेही

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.**(अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | नवीन सब्जी मार्केट ईतवारी पेठ,उमरेड ,उमरेड,नागपुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | नवीन सब्जी मार्केट ईतवारी पेठ,उमरेड ,उमरेड,नागपुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.): **Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री महादेव नत्थुजी गिल्लूरकर | | | 1. बुधवारी पेठ ,उमरेड ,उमरेड,नागपुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

अप क्र 955/19 कलम 7 (A) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनीयम सन 1988 (संशोधन) सन 2018 फियादी --- श्री अली अनवर मोहम्मद बाबर शेख वय 41 वर्ष रा. नवीन सब्जी मार्केट ईतवारी पेठ उमरेड व्यवसाय- अगरबती दुकान आरोपी -- श्री महादेव नत्थुजी गिल्लूरकर वय 47 वर्ष रा. वार्ड क्र 01 बुधवारी पेठ कोटगाव नाका उमरेड ता. उमरेड जि. नागपुर व्यवसाय खाजगी काम घटनास्थळ -- ईतवारी पेठ येथील श्री हुसके यांच्या दुकानाजवळ उमरेड घटना ता वेळ -- 07/12/19 चे 14/46 वा हकीगत असा प्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपी याने तक्रारदार याना एम.एस.ई.डी.सी.एल. उमरेड .येथील लाईन मॅन असल्याचे भासवुन त्याचे घरी जावुन नविन विद्युत मिटरची पाहणी करुन नविन मिटर लावुन देण्याकरीता 5000 रु ची लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारल्याने फिर्यादी चे तक्रापी वरुन सदर चा गुन्हा नोद करु तपासात घेतला.सुचना मा जे.एम.एप.सी. कोर्ट उमरेड यांना रवाना आहे.

13.**Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): PRAFUL VISHWANATH MAHURE

**Rank** (पद): HC (Head Constable)

**No.**(क्र.): POBN **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

आर्थिक देवाण घेवाणीचे व्यवहार किंवा वैमनस्य नाही. त्यांचे विरूध्द कायदेशिर कार्यवाही करिता रिपोर्ट देत आहे. कार्यवाही करीता रू. ५,०००/— हजर करीत आहे.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. सारंग मिराशी यांनी दोन शासकीय पंचांला पाचारण करून त्यांची ओळख करून दिली. पोनि. श्री. सारंग मिराशी यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकीकत सांगुन तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. सारंग मिराशी यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी व मी स्वाक्षरी केली व तद्नंतर पोलीस निरीक्षक श्री. सारंग मिराशी यांनी स्वाक्षरी केली.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. सारंग मिराशी यांनी माझ्याकडून लाचेकरिता वापरण्यात येणारी रक्कम रू. ५००० (ज्यात रू. ५००/— दराच्या १० चलनी नोटा) घेतल्या त्यावेळी माझे व पंचासमक्ष सदरच्या नोटेला अँथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन करावयाच्या कारवाईचे प्रात्यक्षिक करून दाखविले. तसेच व्हाईस रेकॉर्डर कशा प्रकारे काम करतो याबाबत सविस्तर माहिती दिली. त्यावेळी माझेकडून लाच रक्कम म्हणून घेण्यात आलेल्या ५००/— रू चे नोटेस पोहवा सुनिल कळंबे यांनी अँथ्रॉसिन पावडर लावली. त्याबाबत पंचनामा क्र. १ मध्ये नमुद केले आहे. सापळा कार्यवाही दि. ०७.१२.२०१९ रोजी उमरेड येथून करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात येवून मला दि. ०७.१२.२०१९ रोजी उमरेड येथे हजर राहण्याबाबत सुचना देवून उमरेड करिता रवाना केले.

त्यानंतर आज दि. ०७.१२.२०१९ रोजी अंदाजे ११.०० वा. दरम्यान पोनि. सारंग मिराशी यांचा मला माझ्या मोबाईल क्रमांकावर फोन करून नागपूर येथून उमरेड करिता निघाल्याचे सांगीतले. त्यावरून मी उमरेडच्या पुर्वी असलेले गजानन महाराज मंदीराजवळ पोहोचलो. थोडयाच वेळात पोनि. सारंग मिराशी हे सापळा पार्टीतील सदस्य व दोन्ही पंचासह वेळ ११.२० वा. पोहोचले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. सारंग मिराशी यांनी पंचासमक्ष गैरअर्जदार यांची लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरव्दारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले तसेच सापळा कार्यवाही वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर वेळ ११.३६ वा. व्हाईस रेकॉर्डर सुरू करून पंच क्र. १ यांचेसोबत मला गै.अ. महादेव गिल्लूरकर यांची लाचेच्या मागणीच्या पडताळणी करण्याकरिता माझे मोटार सायकलने पाठविण्यात आले. मी पंच क्र. १ सह कार्यालय म.रा.वि.वि. कंपनी उमरेड येथे गेलो असता तेथे गैरअर्जदार महादेव गिल्लूरकर हे हजर मिळून आले नाही त्यामुळे मी व पंच क्र. १ सह सापळा पार्टी थांबून असलेल्या ठिकाणी वेळ १२.०० वा. परत आलो.

त्यानंतर मी माझे मोबाईल फोनने गै.अ. महादेव गिल्लूरकर यांचे फोन वर संपर्क केला असता गै.अ. यांनी मला युवा जागृती जोगीठाणापेठ उमरेड येथे बोलविले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. सारंग मिराशी यांनी पंचासमक्ष गैरअर्जदार यांची लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकॉर्डरव्दारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले तसेच सापळा कार्यवाही वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर वेळ १३.०६ वा. व्हाईस रेकॉर्डर सुरू करून पंच क्र. १ यांचेसोबत मला गै.अ. महादेव गिल्लूरकर यांची लाचेच्या मागणीच्या पडताळणी करण्याकरिता माझे मोटार सायकलने पाठविण्यात आले. मी पंच क्र. १ सह युवा जागृती जोगीठाणापेठ उमरेड येथे गेलो असता तेथे गैरअर्जदार महादेव गिल्लूरकर हे हजर मिळून आले गैरअर्जदार महादेव गिल्लूरकर यांनी मला माझे राहते घरी नविन विद्यूत मिटर लावून देण्याकरिता लाच रक्कम रू. ५०००/— ची मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्शविली. त्यानंतर वेळ १३.३५ वा. पोलीस निरीक्षक श्री. सारंग मिराशी व सापळा पार्टी थांबुन असलेल्या ठिकाणी परत येवून पंच क्र. १ यांच्या आवाजात व्हाईस रेकॉर्डर बंद केला.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. सारंग मिराशी यांनी व्हाईस रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकून गैरअर्जदार श्री. महादेव गिल्लूरकर यांनी तक्रारीचे राहते घरी नविन विद्युत मिटर लावण्याकरिता लाच रक्कम रू. ५०००/— ची मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्शविल्याची खात्री केली.

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): VILAS DASHRATH KALE

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): MH75090

त्यानंतर लगेच सापळा कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. पोलीस निरीक्षक श्री. सारंग मिराशी यांनी सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. तसेच गैरअर्जदार यांनी स्वत: किंवा इतर व्यक्तीचे मार्फतीने लाच स्विकारल्यानंतर माझे डोळयावरील चष्मा काढण्याचा इशारा करण्यास मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच स्विकारणाऱ्यास रंगेहात पकडतील असे सांगीतले.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. सारंग मिराशी यांनी पंचासमक्ष सापळा रचण्यात येणार असल्याचे सांगुन सापळा दरम्यानचे संभाषण व्हाईस रेकॉर्डव्दारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर अँथ्रासीन पावडर लावलेले रू. ५००/– दराच्या एकुण १० नोटा मला देण्यात आले. त्यानंतर मी माझे मोबाईल फोनने गै.अ. महादेव गिल्लूरकर यांचे फोन वर संपर्क करून लाच रक्कम देण्यास कोठे यायचे याबाबत विचारले असता ईतवारीपेठ येथील श्री. हुसके यांच्या दुकानाजवळ बोलाविले. त्यानंतर वेळ १४.१४ वा. व्हाईस रेकॉर्डर सुरू करून धाग्याच्या सहायाने माझे गळयात अडकून पंच क्र. १ यांचेसह ईतवारीपेठ येथील श्री. हुसके यांच्या दुकानाजवळ येथील गैरअर्जदार महादेव गिल्लूरकर यांचेकडे जाण्यास माझे मोटार सायकलने रवाना केले. सापळा पथकातील सदस्य माझे मागो माग आले. त्यानंतर मी व पंच क्र. १ ईतवारीपेठ येथील श्री. घुसके यांच्या दुकानाजवळ पोहोचलो. तेथे गैरअर्जदार महादेव गिल्लूरकर हजर होते. गैरअर्जदार महादेव गिल्लूरकर यांचेशी कामाविषयी बोलणी करून त्यांनी माझेकडून लाच रक्कम रू. ५०००/– स्विकारले. सापळा पथकास मी माझे डोळयावरील चष्मा काढून लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकाने गैरअर्जदार महादेव गिल्लूरकर यास रंगेहात पकडून ताब्यात घेतले. त्यानंतर पंच क्र. १ च्या आवाजात व्हाईस रेकॉर्डर बंद केला. सापळा कार्यवाहीबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. सारंग मिराशी यांनी पंचनामा क्र. २ मध्ये घेतल्या आहेत.

तरी आरोपी खाजगी ईसम श्री. महादेव नत्थुजी गिल्लूरकर वय ४७ वर्ष व्यवसाय–खाजगी काम (म.रा.वि.वि.कं. उमरेड येथील ऑपरेटर) रा. वार्ड नं. १, बुधवारीपेठ, कोटगाव नाका, उमरेड ता. उमरेड जि. नागपूर यांनी मला म.रा.वि.वि.कं. उमरेड येथील लाईनमेन असल्याचे भासवून माझे घरी येवून नविन विद्युत मिटर लावून देण्याकरिता लाच रक्कम रू. ५०००/– ची मागणी करून लाच रक्कम रू. ५०००/– स्वत: स्विकारले म्हणुन माझी त्यांचेविरूध्द कायदेशिर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मराठीत टंकलिखीत केली असुन ती मला वाचुन दाखविण्यात आली. ती माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष
(सारंग मिराशी) 7/12/19
पोलीस निरीक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो, नागपूर

Ali Anwar
7/12/2019
Ali Anwar Sheikh

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)